I J R S S I S,Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 445-451
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारीता व राष्ट्रनिर्माण

प्रविण अ. उपरे
राज्यशास्त्र विभाग, प्रमुख कर्मवीर महाविद्यालय, मूल
*Corresponding Author :-pravinupare10@gmail.com

| Communicated : 02.01.2023 | Revision :08.01.2023<br>Accepted : 15.01.2023 | Published: 27.01.2023 |
|---|---|---|

**सारांश**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे लोकोत्तर पुरूष होते. त्यांनी केलेले कार्य हे संपूर्ण देशासाठी अजोड स्वरूपाचे आहे. त्यांचे विविध विषयावर प्रभुत्व असून समाजकारण, राजकारण, अर्थकारण, कृषी, धर्म, संस्कृती, कामगार व शेती या सर्व विषयावर सखोल चिंतन करून दुर्गामी विचार मांडला. ते कायदेपंडीत, घटनाकार, इतिहासकार, अर्थशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ञ, मुत्सद्दी पत्रकार, महान समाज सुधारक, उत्कृष्ट संसदपटटू अशा चतुरस्त्र भूमिकांमधून भारतीयासह विदेशी लोक सुध्दा त्यांचा गौरव करतात. त्यामुळे सर्वच जगच प्रभावित होवून त्यांची प्रेरणा घेतात. त्यांचे विचार कृतिशिल असून काळाच्या पुढे नेणारे होते. सामाजिक समतेवर आधारीत समाजव्यवस्थेची निर्मिती व्हावी, उपेक्षितांना न्याय आणि सन्मान मिळवण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. त्यांच्या दृष्टीने शिक्षणाला अनन्य साधारण महत्व होते, बाबासाहेबांनी दिलेल्या 'शिका व संघटीत व्हा व संघर्ष करा' या मुलमंत्राने प्रेरीत होऊन कोटयावधी समाजबांधव सक्षम व समर्थ झाले. बाबासाहेबांचे अनेक पैलू लोकांसमोर आहेत. संघर्षशील समाज, क्रांतीकारक विचावंत, व्यासंगिक अभ्यासक, दुरदृष्टीचा नेता, थोर जलतज्ञ, विधीविचारक, प्रबोधन देणा-या जाणिवेचा लेखक अशा अनेक पैलू पैकी काही दुरलक्षीत राहिले आहेत.

डॉ. बाबासाहेब यांच्या पत्रकारितेला १९२० मध्ये प्रारंभ झाला. समाजाने निर्माण केलेल्या दृष्टचक्रातून अस्पृश्य वर्गाला कसे बाहेर काढावे याचा ध्यास त्यांना लागला होता. आजची पत्रकारीता हा व्यवसाय झाला आहे. लोकसभा, विधिमंडळ, न्यायपालिका व प्रशासन हे भारतीय लोकशाहीचे तीन आधारस्तंभ आहेत. चौथा आधारस्तंभ वृतपत्राला मानले जाते. मात्र स्वातंत्र चळवळीतील वृतपत्र स्वातंत्र्य लढयाला अनुसरून पत्रकारिता, प्रसारमाध्यमे हे लोकशाहीचा आवाज उठवतिल, तिचे संरक्षक बनून अन्यायाविरोधात आवाज उठवतील, जनहक्काचे संरक्षण करतील असे बाबासाहेबांना अभिप्रेत होते.

**बिजशब्द** : संरक्षक बाबासाहेब आंबेडकर अर्थकारण, अस्पृश्य समाज **दलित**

**प्रस्तावना :–**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे लोकोत्तर पुरूष होते. त्यांनी केलेले कार्य हे संपूर्ण देशासाठी अजोड स्वरूपाचे आहे.त्यांचे विविध विषयावर प्रभुत्व असून समाजकारण,राजकारण, अर्थकारण, कृषी, धर्म, संस्कृती, कामगार व शेती या सर्व विषयावर सखोल चिंतन करून दुरगामी विचार मांडला. ते कायदेपंडीत, घटनाकार, इतिहासकार, अर्थशास्त्रज्ञ, विषयतज्ञ, मुत्सुद्दी पत्रकार, महान समाजसुधारक, उत्कृष्ट संसदपटू अशा चतुरस्त्र भूमिकांमधून भारतीयासह विदेशी लोक सुध्दा प्रभावित झाले आहे. सामाजिक समतेवर आधारित समाज व्यवस्थेची निर्मिती व्हावी, उपेक्षितांना न्याय आणि सन्मान मिळवण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. त्यांच्या दृष्टीने शिक्षणाला अनन्यसाधारण महत्व होते, बाबासाहेबांनी दिलेल्या 'शिका व संघटित व्हा संघर्ष करा'या मुलमंत्राने प्रेरित होऊन कोटयावधी समाजबांधव सक्षम व समर्थ झाले. बाबासाहेबांचे अनेक पैलू लोकांसमोर आहेत. संर्घर्षशील समाज क्रांतिकारक,

विचारवंत, व्यासंगी अभ्यासक दूरदृष्टीचा नेता, थोर जलतज्ञ विधी विशारद, प्रबोधन देणा—या जाणिवेचा लेखक अशा अनेक पैलू पैकी काही दुर्लक्षित राहिलेले आहे. राज्यघटनेने स्वातंत्र्य, समता आणि बंधूता याची हमी दिली आहे. राज्यघटनेच्या माध्यमातून देशातील वंचित उपेक्षित समाजाच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक पुनरूत्थानाचा मार्ग खुला केला आहे. ''समाजात विषमता जोपासून आपला भारत देश पुढे जाऊ शकत नाही त्यामुळे समाजात भेदभाव असेपर्यंत आरक्षण ठेवावेच लागेल'' असे बाबासाहेबांचे परखड मत होते.

भारतातील ब्रिटीश राजवटीच्या कालखंडात आपल्यातील परखड व बुध्दीवादी वक्तव्यामुळे त्यांनी अनेकदा ब्रिटीशांना देखिल हादरवून सोडले होते. ''मी प्रथम भारतीय आणि अंतिमही भारतीय आहे.'' असे ठणकाहून सांगणारे बाबासाहेब मात्र इथल्या जाचक अन्यायाविरूध्द लढतांना वैतागून म्हणतात, ''मला मातृभूमीच नाही'' असे म्हणायला भाग पाडणारी प्रस्थापीत व्यवस्था म्हणजे भारताला लागलेली जातीयतेची कीड होती.

डॉ. बाबासाहेबांनी खंडा—खंडात विखुरलेल्या, जात—धर्म, प्रांत, भाषा व संस्कृतिक विभागल्या गेलेल्या देशाला एकसंघ बांधणारी भारतीय राज्यघटना अखंड परिश्रम लिहून लोकांना समर्पित केली. ही देशाला दिलेली मौल्यवान देणगी आहे, म्हणूनच डॉ. बाबासाहेबांना '' भारतीय घटनेचे शिल्पकार'' म्हणतात व घटनेमुळे लोकशाहीची पाळेमुळे या भूमीत खोलवर रूजली व सर्वांना समान न्याय अधिकार हक्क प्रगती व विकासाच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

**दलित पत्रकारितेचा प्रारंभ**

डॉ. बाबासाहेब यांच्या पत्रकारितेला १९२० मध्ये प्रारंभ झाला तत्पूर्वी १८८८ साली बाबा वलंगकर यांनी पत्रकारितेला सुरूवात केली होती. २३ ऑक्टो १८८८ रोजी त्यांनी ''विचार विध्वंस'' नावाची पुस्तिका लिहिली होती. समाजाने निर्माण केलेल्या दृष्टचक्रातून अस्पृश्य वर्गाला कसे बाहेर काढावे याचा ध्यास त्यांना लागला होता. दलित समाजातील शिवराव कांबळे यांनी ''सोमवंशी मित्र'' हे पहिले दलित साप्ताहिक प्रकाशित केले.

डॉ. आंबेडकर हे निश्चित भूमिकेतून पत्रकारितेकडे वळले होते. १९१७ साली विविध जाती—जमातीच्या मतदानाच्या अधिकाराच्या संदर्भात काही कर्त्या व्यक्तींच्या साक्षी काढण्यासाठी शासनाने ''साऊथ ब्युरो कमिशन'' नेमले होते त्या कमिशनच्या निमित्याने अस्पृशांच्या राजकिय हक्कासाठी झगडण्याची प्रेरणा त्यांना मिळाली. अस्पृश्याचे म्हणणे जगाच्या वेशीवर टांगण्यासाठी एखादे साधन असावे असे बाबासाहेबांना वाटत होते. ''पंखा शिवाय जसा पक्षी त्याप्रमाणे समाजात विचार प्रवृत्त करण्यासाठी वृत्तपत्राची गरज असते.'' वृत्तपत्राविना अस्पृश्य समाज अनाथ होता त्यांच्याजवळ विलक्षण अशा करूण कहाण्या होत्या म्हणून यामुळे समाजाच्या वेदना व विद्रोह प्रकट करण्यासाठी डॉ. बाबासाहेब पत्रकारितेकडे वळले.

**डॉ. बाबासाहेबांनी सुरू केलेली वृत्तपत्रे**

**मूकनायक**

मूकनायक या पाक्षिकाचा जन्म ३१ जानेवारी १९२० रोजी झाला. मूकनायक म्हणजे मूळ अशा अस्पृश्यांचे नायकपण व नेतेपण स्विकारल्याचे १९२० साली जाहिर केले. यासाठी 'राजश्री शाहू महाराजांचे' आर्थिक यथार्थपणे चालविल्या. माणगाव येथे कोल्हापूर जवळ परिषद घेऊन डॉ. आंबेडकर यांनी दलितांचे प्रश्न मांडले, या परिषदेत ''राज्यश्री शाहू महाराजांनी'' डॉ. बाबासाहेबांचे स्वागत करून ''हाच आता तुमचा भावी नेता'' अशा शब्दात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ओळख करून दिली.

पहिल्या अंकाच्या संपादकीय मध्ये त्यांनी प्रतिज्ञा अशी व्यक्त केली की, ''समाज ही नौकाच आहे. ज्याप्रमाणे

आगबोटीतून प्रवास करणा—या उतारूने जाणून बुजून इतरांचे नुकसान करावे म्हणून म्हणा किंवा आपल्या विनाशक स्वभावामुळे म्हणा जर का इतरांच्या खोलीस छिद्र पाडले तर सर्व बोटी बरोबर त्यालाही आधी किंवा मागाहून जलसमाधी ही घ्यावीच लागणार, त्याप्रमाणे एका जातीचे नुकसान केल्याने अप्रत्यक्ष नुकसान करणा—या जातीचेही नुकसान होणारच यात बिलकूलच शंका नाही म्हणूनच स्वहित साधू वृत्तपत्रांनी इतरांचे नुकसान करून आपले हित करावयाचे पढतमूर्खाचे लक्षण शिकू नयेत.''
मुकनायकाचे ध्येयधोरण स्पष्ट करण्यासाठी तुकारामाच्या ओळी बिरूदासाठी निवडल्या होत्या ''नव्हे जगी कोणी मुकियाचा राजा'' या चरणावरून मुकनायक हे नावही त्यांना सुचले.

**बहिष्कृत भारत**

बहिष्कृत भारत हे पाक्षिक त्यांनी ३ एप्रिल १९२७ रोजी काढले यांचे जे स्वत: संपादक होते या अंकामध्ये बिरूदावली म्हणून ज्ञानदेवाच्या ओव्या उधृत केलेल्या असत 'आला केवळ संग्राम ! संग्रामाशिवाय दुसरे काहीही नाही' अशी युध्दप्रेरणा डॉ. आंबेडकर प्रारंभापासून अस्पृश्यांमध्ये चेतवीत असत या अंकामध्ये आजकालचे प्रश्न प्रासंगिक विचार या सत्रामध्ये त्यांनी स्फूटलेख लिहिले आहे. या स्फुट लेखांची संख्या १४५ आहे.
या लेखाच्या पहिल्या अंकात बाबासाहेब म्हणतात, सुधारणेचा कायदा अमलात आला आहे. इंग्रजाच्या हाती सता काही प्रमाणात वरिष्ठ हिंदी लोकांच्या हाती गेली आहे. ''ज्याप्रमाणे एखाद्या जनावराला त्याच्या निर्दयी धनी कसाबच्या स्वाधीन करतो त्याचप्रमाणे बहिष्कृत वर्गाच्या लोकांना त्यांच्या मायबाप सरकारने वरिष्ठ हिंदी लोंकाच्या स्वाधीन केले आहे.''
बहिष्कृत वर्गाच्या लोकांना जर त्यांना संख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व मिळाले नाही तर त्यांच्या उन्नतीची इतिश्री झाली असे समजावे. कारण ब्रिटिश सरकारचे नि:पक्षपाती धोरण आमच्या वरिष्ठ समाजाकडून ठरवले जाईल इतकी त्यांची मनोभूमिका शुध्द व सात्विक बनलेली नाही आणि हा घोर प्रसंग टाळायचा असेल तर आतापासून चळवळीला सुरूवात केली पाहिजे'' असे त्यांना वाटे.

**जनता**

जनता वृत्तपत्राचा प्रथम अंक २४ नोव्हेंबर १९३० रोजी प्रकाशित झाला. यांचे संपादक श्री. देवराव विष्णू नाईक होते. जनता प्रारंभी पाक्षिक होते. ३ ऑक्टो. १९३१ रोजी ते साप्ताहिक झाले. या वृत्तपत्राची बिरूदावली म्हणून ''गुलामाला तू गुलाम आहेस असे सांगा म्हणजे तो बंड करून उठेल' हे वाक्य होते. याचे नामकरण ४ फेब्रुवारी १९५६ रोजी ''प्रबुद्ध भारत'' असे करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्फुटलेखन

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या वृत्तपत्रातून प्रमुख चळवळी यथार्थपणे चालविल्या म्हणून ते म्हणतात, ''विचार हा काही एखाद्या ज्वालामुखी प्रमाणे आपोआप पेट घेत नाही तो काही कारणापरत्वे प्रज्वलित होतो. ''मराठी वृत्तपत्रीय लेखनाचा स्फुटलेखन हा एक विशेष होय. यात लेखकांच्या व्यक्तिमत्वाचे त्यांच्या जीवन दृष्टिचे, त्यांच्या चिकित्सकतेचे आणि त्यांच्या विचार वैशिष्टयांचे प्रतिबिंब उमटत असते. डॉ. बाबासाहेबांचे स्फुटलेखन बहिष्कृत भारतात आढळते. त्यांनी १९२७ सालच्या पहिल्या वर्षाच्या अंकात ''आजकालचे प्रश्न' या सदरांतर्गत दुस—या वर्षी ''प्रासंगिक विचार'' या सदराखाली स्फुट लेखन प्रकाशित झालेल्या अनेक विषयावर विचार प्रदर्शित करून डॉ. बाबासाहेबांनी आपल्या लेखन वैशिष्टयांचा परिचय घडविला आहे. राजकिय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक या क्षेत्रांशी संस्पर्शीत सबंधीत असे लेखन स्वरूप असल्याने जीवंतपणाचा प्रत्यय येतो. डॉ. बाबासाहेबांची चौफेर दृष्टी

सामाजिक प्रबोधनाची आस, सुक्ष्म निरिक्षण आणि नेमकेपणा तसेच प्रश्नाकडे पाहण्याची मूलभूतता त्यांच्या स्फुट लेखनातून व्यक्त होते. तसेच अर्थपूर्ण शीर्षक हा तर आणखी एक विशेष होता.

**डॉ. बाबासाहेबांची वृत्तपत्रीय भूमिका**

हिंदूस्थानातील आणि महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात मान्यता पावलेल्या व्यक्ती जीवनाचा व विचारांचा परामर्श घेणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे प्रासंगिक लेखन विपूल आहे ते व्यक्तिपूजा व व्यक्तिदर्शनात्मक लेखनापासून अलिप्त राहिले. लाला लजपतराय असोत की वल्लभभाई पटेल असोत लोकहितवादी असोत की रामास्वामी नायकर असोत टिळक, चिपळूणकर असोत की, आगरकर असोत या सर्वाच्या व्यक्ती जीवनातील व्यंगापेक्षा त्यांच्या व्यक्तिमत्वातील अनेक पैलूंचा आणि विचारदिशांचा मागोवा ते घेतात, म्हणून या लेखकाला काळमूल्य आहे तसे विचारमूल्यही आहे.

लोकहितवादीच्या लेखकाने डॉ. बाबासाहेब विशेष प्रभावित झाले होते असे दिसते. लोकहितवादी, आगरकर किंवा महात्मा फुले या तिन्ही समाजचिंतांनी विषम समाजरचना नष्ट होऊन सामाजिक समतेच्या पायावर नवी रचना निर्माण व्हायला हवी असा पायाभूत विचार मांडला होता. व्यक्तिस्वातंत्र्यांवर तर त्यांचा प्रगाढविश्वास होता व त्यांच्या सर्वांनी हिरीरीने पुरस्कार केला होता.

महात्मा फुले अवतारवादाचे कडवे विरोधी आगरकर आज्ञेयवादी तर लोकहितवादी ईश्वरनिष्ठा होते. लोकहितवादीच्या बुध्दीवादी आविष्कार म्हणजे ''शतपत्र'' ही पत्रे बहिष्कृत भारतातून पुन्हा प्रकाशित करण्याचा मनोदय होता त्यातील काही पत्रे प्रकाशितही केली.

वल्लभभाई पटेल, पंडित जवाहरला नेहरू, सुभाषचंद्र बोस, न.वी. गाळगीळ, पं. मदन मोहन मालवीय, ह. भ. प. पांगारकर यांसारख्या देशात व समाजात प्रतिष्ठित स्थान प्राप्त केलेल्या व्यक्तीविशेषाचीही प्रसंगपरत्वे दखल घेऊन डॉ. आंबेडकरांनी त्यांच्या कार्याचा कधी गौरव तर कधी कार्यावर टिका केली आहे. जे जे निषधार्ह वाटते त्याला सद्सदविवेकबुध्दीने विरोध करणे व जे जे उन्नत वा स्विकारार्ह वाटते त्याचा अविलंब करणे हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्टय होते. दुटप्पीपणा व खोटी प्रतिष्ठा बाबासाहेबांच्या टिकेचा नेहमीच विषय होत असतो.

कोणताही विचारवंत टिकाविषय होतो तो त्याच्या वादळी व्यक्तिमत्वाने, कार्याने आणि विचाराने भारतातील टिकाविषय झालेल्या व्यक्तिंचा विचार करावयाचा झाला तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव अग्रस्थानी असेल. त्यांच्या कार्यावर, विचारांवर आणि व्यक्तिमत्वावर टिका करणा—यांमध्ये काळ, नवयुग, प्रभाग, कुलाबा, समाचार, पुरूषार्थ, सकाळ, भाला, लोकमान्य, अग्रणी, केसरी, नवाकाळ यांचा प्रामुख्याने समावेश होतो तर ज्ञानप्रकाश, निर्भीड, विविधवृत यासारखी काहीच पत्रे दलितांचे प्रश्न उचलून धरीत आणि डॉ. बाबासाहेबांच्या भूमिकेला न्याय देत. वृतपत्रीय टिकांना उत्तरे देण्याचे आणि आपली भूमिका स्पष्ट व खरमरीतपणे मांडण्याचे कार्यही डॉ. बाबासाहेबांनी केले आहे. एखाद्या विचारवंतांच्या विचारांवर टिका होण्याची काही कारणे संभवतात. १. तो विचार स्वतंत्र असतो. २. तो विचार प्रस्थापित विचार प्रवाहविरूध्द असतो. ३. तो विचार क्रांतिकारी व नवनिर्माणक्षम होते. या नामावलीत आणखी एक नाव समाविष्ट करावे लागेल आणि ते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना त्यांच्यावर होणा—या टिकेचे स्वरूप पूर्णत: अवगत होते. माणसाला सर्वाचे समाधान करता येणे अशक्य आहे, त्यांची पुरेपूर जाणिव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आहे. जो कोणी तसा प्रयत्न करीत त्याला अपयश पत्करावे लागते. 'अजातशत्रू' जगात सापडणे कठीणच. युधिष्ठिराल 'अजातशत्रू' संबोधले जाते.

स्वत: धर्मराज कोणाशी शत्रुत्व करीत नव्हता या दृष्टिने तो अजातशत्रू होता. परंतू त्यांच्याशी शत्रुत्व करणारे दुर्योधनासारखे त्याचेच भाऊबंद होते. याचा अर्थ जगात टिकाकार हा प्राणी असणारच. आणि याची जाणिव सार्वजनिक वावरणा—याला ठेवावीच लागते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सार्वजनिक जीवनात प्रवेश केल्यानंतर टिका, दोषारोपण, आक्षेप यांची पुरेपूर जाणीव होती. सार्वजनिक आयु:क्रम म्हणजे एकप्रकारचे रणांगण आहे आणि म्हणून प्रतिपक्षाबरोबर दोन हात केलेच पाहिजेत. एका बाबतीत मित्र असणारे, दुस—या बाबतीत शत्रु होण्याची शक्यता त्यांनी नाकारली नाही. हेतुबद्दल शंका नसल्यामुळे होणा—या टिकेचे त्यांना कधीच भय वाटले नाही. अर्थात मनुष्य हा सर्वज्ञ आणि सत्याधिष्ठित असावा असा त्यांचा आग्रह आहे, म्हणजे टिका समजून घेण्याचा आणि तो स्विकारण्याचा खिलाळूपणा जसा त्यांच्यात आहे. तसेच टिका परवतून लावण्याची जिद्दही त्यांच्याजवळ आहे. त्यांच्या लेखणीचा आणि व्यक्तिमत्वाचा हा धर्म आहे. सार्वजनिक मतभेदावरून किंवा खाजगी व्देषाने प्रेरित होऊन जे निर्घृण टिका करतात त्यांना डॉ. बाबासाहेबांनी बहि:शत्रु' असे म्हटले आहे. परंतू जे 'गोताला काळ होणारे कु—हाडीचे दांडे' किंवा अस्तनीतले निखारे' आहेत. त्यांना, त्यांनी 'अंत:शत्रु' संबोधले आहे. पहिल्या वर्गातील टिकाकारांचा रोख बाबासाहेबांच्या सामाजिक, राजकिय व धार्मिक विचारांवर आहे. अर्थात ही सर्व टिका सामंजस्यपूर्ण, साधार आणि हितप्रद होतीच असे नाही. केवळ टिकेचे मोहळ उठविण्यात धन्यता मानण्याचीही काही वेळा प्रवृत्ती होती. त्यांच्यावर काही ठळक आक्षेप असे आहेत.

१. डॉ. बाबासाहेब हे समाज—समता संघाचे अध्वर्यू असता त्यांनी अस्पृश्य समाजासाठी जातवार प्रतिनिधीत्वाची मागणी कशी काय केली ?

२. डॉ. आंबेडकर हे स्पृश्य वर्गाचा व्देष करतात.

३. गीता व वेद यावर टिका हा गुन्हा.

**पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणून अद्यापही वृत्तपत्र दृष्टिने बाबासाहेबांची म्हणावी तेवढी दखल घेतल्याचे दिसून येत नाही. वास्तविक पाहता डॉ. बाबासाहेबांची पत्रकारिता ही काही पोटभरू किंवा प्रचारकी पत्रकारिता नव्हता तर तिला समाजोध्दाराचे पर्यायाने राष्ट्रोध्दाराचे मुलभूत अधिष्ठान लाभलेले होते. या क्षेत्रातील पारंपारिक मानसिकतेमुळे किंवा जाणीपूर्वक कानाडोळा केल्याने त्यांच्या पत्रकारितेची दखल घ्यावी असे वाटले नसावे. बाबासाहेबांची पत्रकारिता ही इतरांपेक्षा वेगळी होती ही म्हणजेच संपूर्ण मानवमुक्तीचा धगधगता अंगार होती वरपांगी समाज सुधारणा त्यांना मान्य नव्हती. एका बाजूला राजकिय स्वांतत्र्यासाठी आकाशपाताळ एक करणारे नेते मात्र माणसाला माणूसकीचे निसर्गदत्त अधिकार आणि देण्यास तोंडातून शब्दसुध्दा काढत नव्हते, त्या हक्कांची जाणीव करून देण्याचा प्रमाणित प्रयत्न बाबासाहेबांनी वृत्तपत्रातून केला ''राजकारणाचे सर्वसाधारण असे दोन हेतू आहेत एक शासन आणि दुसरा संस्कृती, अन्याय सहन न होणे मनुष्याच्या मनाचे उन्नत स्वरूप होय'' असे बाबासाहेबांना वाटायचे.

पत्रकारितेसाठी आवश्यक असणारी अत्युच्च दर्जाची पात्रता डॉ. बाबासाहेबांच्या अंगी होती उच्च कोटीचे तत्वज्ञान, प्रकांड पंडित्य, गाढा अभ्यास, समुद्राचा ठाव घेणारी विश्लेषण क्षमता, याचबरोबर भाषिक सौंदर्याचे उत्तुंग दर्शन त्यांच्या वृत्तपत्रांमधून दिसून येते. एकुणच डॉ. बाबासाहेबांची पत्रकारिता ही इतर पत्रकारापेक्षा अतिशय प्रतिकुल परिस्थितीशी सामना करणारी म्हणूनच भिन्न स्वरूपांची होती त्यांना एकाच वेळी अनेक आघाडयांवर

लढावे लागत होते. अशिक्षित दारिद्रयाने पिचलेल्या समाजाचे नेतृत्व करायचे होते.

सध्याच्या पत्रिकारितेने डॉ. आंबेडकर यांच्या पत्रकारितेकडून खूप काही शिकण्यासारखे आहे. सध्या अनेक वृत्तपत्रे सवंत लोकप्रियतेसाठी अनेक नैतिक–अनैतिक मार्गसुध्दा बिनबोभाटपणे चोखाळतांना दिसतात हा आता व्यवसाय झाल्याने यात प्रचंड स्पर्धा वाढलेली दिसते. लोकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यापेक्षा नेते–अभिनेते यांच्याच बातम्या येतात म्हणून बाबासाहेबांची कारकिर्द अंत:र्मुख व्हायला भाग पाडते. कारीव वृत्तपत्रीय प्रपंच करूनही डॉ. बाबासाहेबांना पत्रकार डॉ. आंबेडकर म्हणून कोणी मानाचा मुजरा केला नाही.

**वृत्तपत्राची आचारसंहिता**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे व्यासंगी पत्रकार होते, सामाजिक प्रबोधन आणि सामाजिक न्याय या तत्वांचा पत्रकारितेच्या क्षेत्रात त्यांनी आग्रह धरलेला होता. त्यांची पत्रे ध्येयवादाने भारावलेली व नैतिकता हा वृत्तपत्रसृष्टीचा कणाच होता. जेव्हा मराठी पत्रे जेव्हा वैयक्तिक निंदानालस्ती आणि गलीच्छ राजकारणाचे अड्डे बनू लागले तेव्हा त्यांच्यातील ध्येयवादी पत्रकार उसळून उठला. ''महाराष्ट्रातील कित्येक वृत्तपत्रे अज्ञानी लोकांना मूर्ख बनवण्याचे कारखाने आहेत. ''महाराष्ट्रात एक ध्येयशील पत्रकारितेची परंपरा आहे. वृत्तपत्रांनी आचारसंहिता पाळली नाही आणि तंत्र स्वैर असले तर अज्ञजण रानभरी होतील'' असे त्यांना वाटत होते. भडकाऊ विकृत आणि भावनांना आव्हान करणारे लेखन लोकमानस घडवू शकणार नाही, लोकजीवनाला नवे परिणाम देऊ शकणार नाही अशी त्यांची खात्री होती. म्हणूनच वृत्तपत्र हे शोषणाचे माध्यम बनविणा–या प्रवृत्तीला त्यांनी धारेवर धरले.

त्यांच्यामते ''भारातातील अनेक वृत्तपत्रांना व्यक्तीपूजा ही वृत्तपत्रांना लागलेली कीड आहे ती आंधळी असते त्यांमुळे नितीमत्ता ढळते म्हणून वृत्तपत्रांनी नीतीमत्तेला बाधा येणार नाही याची काळजी घेतली पाहिजे'' वृत्तपत्रांचा प्रपंच म्हणजे नीतीमत्तेचा प्रपंच अशी त्यांची धारणा होती वृत्तपत्रांचा विविध अगांचा विचार करताना बाबासाहेबांनी जसा लेखनाचा, संपादनाचा, व्यवस्थांचा विचार केला तसाच जाहिरातीचा ही विचार केला. जाहिरातीशिवाय वृत्तपत्रे जगू शकत नाही, हे खरे असले तरी त्यांच्या किती आहारी जावे आणि कितपत जावे ? आर्थिक सबलतेसाठी जाहिराती आवश्यक असल्यात तरी कोणत्या जाहिराती प्रकाशित करावे यासंबंधीची संहिता पाळायला हवी. वृत्तपत्र हा केवळ व्यापार नव्हे तर लोकमत घडविण्याची व लोक शिक्षणाचे प्रभावी माध्यम असल्यामुळे वृत्तपत्रांनी पथ्ये पाळण्याची गरज असते.

**आजची पत्रकारिता**

पत्रकारितेची ही महान परंपरा बाळशास्त्री जांभेकर, लोकमान्य टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, खाडिलकर, महानजी, आचार्य अत्रे यांच्या पासून सुरू राहिलेली परंपरा ही परंपरा पत्रकारितेला समर्पित अशी झपाटलेली पत्रकारिता होती. त्या काळात छपाईच्या क्षेत्रात कोणतीही आधुनिक व्यवस्था नसतांना या व्यवसायाचा धंदा न करता केलेली पत्रकारिता होती. मराठी पत्रकारितेत एक दरारा होता, धाक होता, चारित्र्य होते. वृत्तपत्राचे आजचे स्वरूप जाहिरातीने व्यापलेले, अर्थकारणाशी जोडलेले आहे. राजकारण्याची हत्यार म्हणून, जनजागरण म्हणून, समाज प्रबोधन म्हणून, अशा कोणत्याही एकाही धोरणांनी आजची पत्रकारिता चालू शकलेली नाही. जगाच्या बाजाराचे स्वरूप बदलेले त्यामुळे त्यांचा संभाव्य परिणाम वृत्तपत्रावर झालेला आहे. वृत्तपत्र वाचकांची जागा आता ग्राहकाने घेतलेली आहे, तर वृत्तपत्र या वस्तूने प्रॉडक्टची जागा घेतलेली आहे. केसरी, लोकमान्य, नवयुग, मराठा हे केवळ अग्रलेखासाठीच वाचले जायचे. विविध रंगामुळे

वृत्तपत्र रंगपंचमी इतके रंगवता येते पण लिखाणाच्या खोलीचा पुरेसा दर्जा फार घसरला आहे. आजच्या काळात बोरवेल पाचशे फुट खोल गेली तरी पाणी लागत नाही अशी गत वृत्तपत्राची झाली आहे. तसेच मराठी पत्रकारितेची सगळयात मोठी बदनामी 'पेड न्युज' ने करून टाकली. आजची विश्वासार्हता आमच्याच हातांनी गमावलेली आहे.

काही अपवादात्मक निर्भिड पत्रकारिता आणि वृत्तपत्रे सोडली तर बाकीची कोणत्या दबावाखाली आहे. याचा शोध घेणे महत्वाचे आहे. जिथपर्यंत बातमीच्या अर्थकारणात असलेल्या पत्रकारितेला बाहेर काढून निखळ बातमीशी जोडले जात नाही तोपर्यंत बाळकृष्ण जांभेकर, डॉ. आंबेडकरांशी आमचे नाते सांगण्याचे चारित्र्य आमच्याजवळ राहिलेले नाही, हे संकोच न करता कबूल केले पाहिजे.

विचारांची दिशा देणारी पत्रकारिता आज सौम्य होत चालली आहे. पूर्वीच्या काळात समाजात जागृती निर्माण करण्याचे काम वृत्तपत्रांनी केले. सकारात्मक बातम्या ऐवजी नकारात्मक बातम्यांना प्राधान्य दिले जात आहे. समाजापुढे काय द्यायचे आणि काय नाही यांचा विवेक पत्रकारापुढे असायला पाहिजे. पत्रकारांची नजर शोधक असली पाहिजे. पत्रकारांनी सत्य, प्रामाणिकपणा आणि विश्वासार्हता या तीन बाबी समोर ठेवून पत्रकारिता केल्यास खऱ्या अर्थाने पत्रकारितेला अर्थ प्राप्त होईल. सामाजिक लोकशाही संकेत व सिध्दांतानुसार मांडण्यात आलेल्या लोकशाहीचा चौथा स्तंभ असून आतून भ्रष्टाचार, पक्षपातीपणा यांच्या वाळवीन पोखरला गेला आहे. त्यामुळे या स्तंभाचा बळकटपणा केव्हाच जाऊन आता सांगाळाच शिल्लक राहिला आहे. बहुतांशी प्रसारमाध्यमे आपले बस्तान स्थिर ठेवण्यासाठी सत्ताधारी पक्षांची तळी उचलून धरतात. सत्ताधारी पक्षांच्या अन्यायकारक धोरणावर यथायोग्य टिका करण्याऐवजी त्यांच्याकडे कानाडोळा करून जनतेचे लक्ष एखाद्या चमचमीत विषयाकडे वळवतात.

ज्याप्रमाणे पत्रकारिता हा व्यवसाय झाला आहे त्याप्रमाणे लोकसभा–विधिमंडळ, न्यायपालिका व प्रशासन हे भारतीय लोकतंत्राचे तीन आधार स्तंभ आहे. त्याप्रमाणे भारतीय वृत्तपत्राला (मिडीयाला) भारतीय लोकतंत्राचा चौथा स्तंभ मानला जातो. कारण जेव्हा ही पहिली तीन स्तंभ आपल्या कर्तव्यापासून दूर जातात, तेव्हा त्यांना मार्गावर आणण्यासाठी हा चौथा स्तंभ कार्यरत होतो.

मूळच्या भारतीय राज्यघटनेमध्ये पत्रकारितेचा उल्लेख नाही. मात्र स्वातंत्र्य चळवळीतील वृत्तपत्र स्वातंत्र्य लढयाला अनुसरून पत्रकारिता, प्रसारमाध्यमे ही लोकशाहीचा आवाज उठवतील, तिचे संरक्षण बनून अन्यायाविरोधात आवाज उठवतील, जनहक्काचे संरक्षण करतील हे भारतीय घटनाकारांना अभिप्रेत होते.

**संदर्भ :**

कीर धनंजय – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

महात्मा ज्यातिराव फुले

राजश्री शाहू छत्रपती

पानतावणे गंगाधर – पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर

बहिष्कृत भारत, मूकनायक, जनता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर

गौरव अंक, विकासपीडीया, प्रहार, आपला आदर्श आपली प्रेरणा महामानव.